# फुलोरा, मणीलाग अवस्थेतील गळ; कारणे, उपाययोजना

**द्राक्ष सल्ला**

डॉ. एस. डी. रामटेके,
स्नेहल खलाटे

**जास्त पाऊस झाल्यानंतर वातावरणातील आर्द्रता जास्त प्रमाणात वाढते. या स्थितीमध्ये फुलोरा गळ आणि मणीगळ दिसून येण्याची शक्यता असते. त्यामुळे बागेची विशेष काळजी घेण्याची गरज आहे.**



फुलोरा गळ होण्याची अवस्था.

उत्तम घडाच्या निर्मितीसाठी उच्च प्रकाशाची तीव्रता, उबदार तापमान, जमिनीतील पुरेसा ओलावा आणि पोषक तत्त्व इत्यादी घटकांचा समावेश होतो. प्रत्येक द्राक्ष बागायतदाराला उत्तम प्रतीच्या घडाची निर्मिती हवी असते. फलित फुले द्राक्षात आणि नंतर ते परिपूर्ण कलस्टरमध्ये विकसित होतात. मात्र द्राक्षाची नाजूक फुले पाऊस, वारा किंवा थंड तापमानाच्या संपर्कात आल्यास फुलोरा अवस्थेत गळ झालेली दिसून येते. या परिस्थितीमध्ये बागेमध्ये फुलोरा गळ व मणीगळ ही वनस्पती शास्त्रीय विकृती दिसू लागते. जास्त पाऊस झाल्यानंतर वातावरणातील आर्द्रता जास्त प्रमाणात वाढते. ही स्थिती विविध रोग आणि किडींच्या प्रादुर्भावासाठी पोषक ठरते. तसेच फुलोरा गळ आणि मणीगळ देखील दिसून येण्याची शक्यता असते. या वर्षी भरपूर पाऊस झाल्यामुळे बागेची विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

## फुलोरा गळ

- ही विकृती वातावरणातील बदल, वेलीतील अन्नसाठा, संजीवकांचा समतोल व पाण्याचे जमिनीतील प्रमाण या घटकांवर अवलंबून असते.
- कॅनॉपी जास्त दाट असल्यास सर्वच घड आणि मण्यांना अन्नद्रव्यांचा पुरवठा विपुल प्रमाणात होत नाही. अशावेळी फुलोरा गळ होते. जर मणी लाग झाल्यास पुढे गळ सुद्धा होते.

## मणीगळ

- ही विकृती फुलोरा अवस्था सुरू होण्यापूर्वी आणि फुलोरा अवस्थेत आढळते. घडाला टिचकी मारली तरी न फुललेले किंवा फुललेले मणी गळून पडतात. पूर्ण घड रिकामा झाल्याप्रमाणे दिसतो. त्यामुळे उत्पादनात घट येते.
- जमिनीत फॉस्फरसचे जास्त प्रमाण, पोटॅशिअमचे कमी प्रमाण, जास्त क्षारता, पाण्याचा ताण इत्यादी बाबींमुळे ही विकृती दिसून येते.

## फुलोरा व मणीगळवर परिणाम करणारे घटक

- **वातावरणातील बदल :** दिवस व रात्रीच्या तापमानातील तफावत.
- **अन्नद्रव्य किंवा संजीवकांचा समतोलपणा :** फॉस्फरसचे जमिनीतील जास्त प्रमाण आणि वेलीतील ॲबसेसिक ॲसिडचे जास्त प्रमाण.
- द्राक्ष जातीची ताण सहन करण्याची क्षमता.
- वेलीची कॅनॉपी खूप जास्त.

## उपाययोजना

- वेलीवर घडांची संख्या निर्धारित ठेवावी.
- वेल विस्तार व्यवस्थापन योग्य ठेवावे. त्यामुळे सुटसुटीत कॅनॉपी तयार होईल. वेलीला भरपूर सूर्यप्रकाश मिळून पोषणासाठी आवश्यक अन्नसाठा उपलब्ध होईल. त्यामुळे विकृती टाळता येईल. पाण्याचा ताण देऊ नये.
- संजीवकाचा वापर योग्य प्रकारे करावा. घडाचा विस्तार व्यवस्थित झाला असल्यास फुलोरा अवस्थेत जिब्रेलिक ॲसिडचा वापर टाळावा. तसेच बरीच रसायने एकत्रित मिसळून वेलीला देऊ नयेत.
- फुलोरा अवस्थेआधी : जी.ए. अधिक बुरशीनाशक अधिक पी. एच. कमी करणारे रसायन एकत्रित द्यावे.
- मणी ३ ते ४ मिमी आकाराचे झाल्यानंतर- जी.ए. अधिक बुरशीनाशक अधिक पी. एच. कमी करणारे रसायन अधिक सीपीपीयू रसायन एवढीच एकत्रित द्यावीत.

(**टीप**- लेखात शिफारस केलेली कोणतेही रसायने वा घटक वापरताना राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांचा सल्ला घ्यावा व मगच त्यांचा अवलंब करावा.)

- डॉ. एस. डी. रामटेके, ९४२२३१३१६६, (राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि. पुणे)

- कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट ॲग्रेस्कोप्राप्त आहेत.
- फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे.
- खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे.
- बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे.
- लेबल क्लेम वाचावेत.
- पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत.
- रसायनांचा गट तपासावा.
- पीएचआय, एमआरएल तपासावेत.
- पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.



मणीगळ होण्याची स्थिती.


## छोट्या जाहिराती

व्यवसायवृद्धीचा मार्ग

क्लासिफाइड: दहा ओळींसाठी कमाल १०० शब्दांपर्यंत, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना: २ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १० पेड + १२ फ्री

### व्यवसायविषयक

#### व्यवसाय धंदा

**शेती फळबागा मजुरांसह** लागवड जोपासना व मार्केटिंग करून देऊ. तयार फळबागांचे मेंटेनन्स व कमी खर्चाचे जिवंत कारेरी कंपाऊंड ही करतो. www.agrifrutfarming.com 9850601641

**तज्ज्ञांनी नावाजलेला शेती** विषयक दिवाळी अंक उपयुक्त. लेख, कथा प्रवासवर्णन इ. रु. ७५/- + पोस्टेज. संपर्क : ८९९१७८९३२४ / ०२०-२४३०१७१०

### नोकरीविषयक

#### नोकरी देणे

**पाहिजेत कस्तुरी ॲग्रो** फर्टिलायझर, पुणे कंपनीसाठी संपूर्ण महाराष्ट्र क्षेत्रासाठी कमिशन बेसीसवर मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह नेमणे आहे. इच्छुक उमेदवारांनी त्यांचा बायोडाटा मेल पाठवावा E- financeac.kaf2021@gmail.com / W.App. 9158316606.

**टिश्यु कल्चर नर्सरीमध्ये** संधी नर्सरी सुपरवायझर, शिक्षण बी.एस्सी ॲग्री. अनुभवास प्राधान्य. विंग ता. कराड, जि. सातारा. मोबा. 9823067755.

### शेतीविषयक अन्य विषय

#### वनीकरण / वृक्षारोपण

**पारंपारिक पिकपद्धती बरोबर** महोगनी वनशेतीद्वारे नियमित व दिर्घकालीन एकरकमी उत्पन्नाची हमी. मिटकॉन या नामांकित संस्थेद्वारे कार्बन क्रेडीटचा प्रति एकर प्रति वर्षे अधिक मोबदला पीक व्यवस्थापन लाकूड कापणी, वाहतूक व हमीदराने खरेदीचा करार या नाविन्यपूर्ण प्रकल्पात सहभागी होण्यासाठी आजच संपर्क करा. महोगनी व्हिव ॲग्रो प्रा.लि. पुणे 9112150027, 9119456969, 9022364020.

### शेतीविषयक व्यवसाय

#### इतर व्यवसाय

**शेती व पोल्ट्रीसाठी** ताडपत्री उन्हात लवकर खराब न होणारी, टिकाऊ, ८ फूट उंची पर्यंत जॉईन्ट नसलेली, पाहिजे त्या साईज मध्ये मिळेल मो- ०२२-४१३११७८८/ ९२२२७७४१४३.

#### पशुधन व्यवसाय

#### मत्स्यपालन

**मत्स्यबीज मिळेल जाती** राहु, कटला, मिरगल, मरळ सुपरनेस (कोंबडा) कोळंबी इ. मत्स्य प्रशिक्षण केंद्र अहमदनगर. ८८८८६५०११८/ ८०८७९९६१००.

### बी - बियाणे

#### बियाणे / रोपे विक्री

**आमच्याकडे उत्तम प्रतीचे** खात्रीशीर गावरान पुना फुरसुंगी जातीचे व आमच्या शेतात तयार केलेले, उगवण क्षमता ८५ ते ९५% असलेले दोन पत्ती कांद्याचे बियाणे उपलब्ध मु.पो. नारायणगाव, ता.जुन्नर, जि. पुणे. 9970171212.

### खते / औषधे

#### खते / औषधे विक्री

**विषमुक्त जीवन जगण्यासाठी** गोमित्र गोशाळा सोलापूर येथे पंचगव्य निर्मित खते, औषधे, टॉनिक कीटनियंत्रक, बुरशी नाशक अन्नधान्य, कडधान्ये इ. मिळेल. संपर्क : ८८३०५६११३१.

eSakal.com

**वाचकांसाठी निवेदन**
सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत 'सकाळ' व्यवस्थापन हमी देऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.
-वरिष्ठ व्यवस्थापक, ॲग्रोवन

### जाहिरातीसाठी संपर्क

- पुणे- शितल : ९९७५७६५८३८
- सातारा- संकेत : ९९७५६२६४३९
- सांगली - शीतल : ९८८११२९२९३
- नाशिक- चेतन : ९१६८६६११५८
- औरंगाबाद- दत्ता : ८६२४०२३२५६
- अहमदनगर- सचिन : ८८८८९६६५८२
- नागपूर- प्रशांत : ८८८८७९८६००
- अकोला- महेश : ९०११०६१९३३
- जळगाव- भूषण : ९९६०४११११६
- सोलापूर- पियुष : ९३७३९७९८०८

ॲग्रोवन, सकाळ मीडिया प्रा. लि. ५९५ बुधवार पेठ, पुणे -४११००२.
फोन नं.: ०२०-२४४०५८४५, E-Mail : advt.agrowon@esakal.com